# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
☎ २५६५६२३४, E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in, Web : www.ropune.org.in

***तात्काळ / महत्वाचे :***

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३ (अ)/संगणक सूट/२०१९/ 5315 दिनांक : 09 DEC 2019

प्रति,

संचालक / प्राचार्य / उपसचिव,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालय प्रमुख.

**विषय : दिनांक ०१/०१/२००६ रोजी किंवा त्यापूर्वी निवड प्रक्रीया सुरु झालेल्या, तसेच सध्या शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त न केल्यास करावयाची उपाय योजना...**

संदर्भ : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २०/०७/२००२.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दिनांक ०५/०५/२००७.
(३) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/ कार्या १२, दिनांक २८ मे, २०१८.

संदर्भ क्रमांक (१) चे शासन निर्णयानुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करावयाच्या अवधीस दिनांक ०१/०१/२००७ पासून दिनांक ३१/१२/२००७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून, शासकीय सेवेतील गट अ, गट ब व गट क मधील अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ही **अंतिम मुदतवाढ** समजण्यात यावी, असे नमूद कळविले आहे.

तसेच संदर्भ क्रमांक (२) च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ३ नुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त न केल्यास अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट न मिळाल्यास, तसेच संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या दिनांकापर्यंत त्यांची वार्षिक वेतन वाढ रोखून ठेवण्याबाबत सूचित केले आहे.

संदर्भ क्रमांक (३) येथील दिनांक २८ मे, २०१८ च्या अधिसूचनेतील मुद्दा क्रमांक २ नुसार शासकीय कर्मचा-याने विहीत केलेल्या कालावधीत किंवा या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये वाढवून दिलेल्या विहीत कालावधीत प्रमाणपत्र सादर न केल्यास, अशा व्यक्तींची वेतनवाढ, असा विहीत कालावधी संपल्यानंतर ते प्रमाणपत्र सादर करेपर्यंत किंवा प्रमाणपत्र सादर करण्यास सूट मिळेपर्यंत रोखून धरली जाईल आणि दरम्यानच्या कालावधीत त्यांचा पुढील पदोन्नतीसाठी विचार करण्यात येणार नाही.

जेव्हा अशी व्यक्ती तिची वेतनवाढ रोखलेली आहे, प्रमाणपत्र सादर करेल किंवा तिला प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल, तेव्हा अशा प्रकारे रोखून धरलेली वेतनवाढ तिला ज्या तारखेला तो प्रमाणपत्र सादर करेल किंवा ज्या तारखेला तिला प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल त्या तारखेला देय होईल आणि जणू काही तिची वेतन वाढ रोखली गेली नव्हती असे समजून ती उपार्जित होईल, परंतु वेतन वाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

दिनांक २८ मे, २०१८ च्या अधिसूचनेतील मुद्दा क्रमांक ३ नुसार वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल, तसेच मुद्दा क्रमांक ४ नुसार कोणत्याही शासकीय विभागात वाहनचालक म्हणून नियुक्ती झालेल्या व्यक्तीस प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल.

सबब आपल्या संस्थेतील गट अ, गट ब व गट क मधील ज्या अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र अद्याप सादर केलेले नसेल, अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविली नसेल, अशा अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत दिनांक २०/०७/२००२ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार कार्यवाही करुन, नियमानुसार वसूली करणेबाबतची कार्यवाही त्वरित करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

E:\my documents\Computer Exam Exemption.docx\14